वाचा:- १. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१०/प्र.क्र.२१०/१०/१२, दि.०३/०६/२०११.

क्र.स्था.१८/ब/लेपलि/विभाग बदली २०१८/ आस्था-५ / 9063

संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा,
महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, ६ वा माळा,
नवी मुंबई ४०० ६१४.
दि. 28 MAY 2018

**विषय:- लेखापरीक्षा लिपिक संवर्ग विभागबाह्य बदली.**

## आदेश

स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयाच्या अधिपत्याखालील लेखापरीक्षा लिपिक संवर्गातील खालील **रकाना क्र.३ मधील** कर्मचाऱ्यांची त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या रकाना क्र.५ मधील प्रादेशिक विभागात **विभागबाह्य बदली** करण्यात येत आहे:-

| अ.क्र. | विभागाचे नाव | कर्मचाऱ्याचे नाव, पदनाम, कार्यालयाचे नाव व ठिकाण | प्रवर्ग | बदली करण्यात येत असलेला विभाग | रकाना क्र.४ मधील पद रिक्त / उपलब्ध होण्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | कोकण विभाग | श्री.तु.श. चौधरी, लेखापरीक्षा लिपिक, संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई | इ.मा.व (सरळसेवा) | नाशिक विभाग | निर्बाध पद रिक्त असल्यामुळे |
| २ | कोकण विभाग | श्री.रा.यु.रामटेके, लेखापरीक्षा लिपिक, संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई | अ.जा (सरळसेवा) | नागपुर विभाग | निर्बाध पद रिक्त असल्यामुळे |
| ३ | कोकण विभाग | श्री.र.ह. सकुंडे, लेखापरीक्षा लिपिक, संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई | खुला (सरळसेवा) | पुणे विभाग | निर्बाध पद रिक्त असल्यामुळे |
| ४ | औरंगाबाद विभाग | श्री. अ.अ.आतराम, लेखापरीक्षा लिपिक, उप संचालक, उपविभाग-३, स्थानिक निधी लेखापरीक्षा, औरंगाबाद यांचे कार्यालय | अ.ज. (सरळसेवा) | नागपुर विभाग | निर्बाध पद रिक्त असल्यामुळे |

वरील कर्मचाऱ्यांच्या बदल्या **महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५** मधील तरतुदीनुसार करण्यात आल्या आहेत. वरील कर्मचाऱ्यांची ज्या प्रादेशिक विभागात बदली झाली आहे त्या प्रादेशिक सह संचालकांनी सदर कर्मचाऱ्यांना त्यांचे अधिनस्त कार्यालयात पदस्थापना देण्याचे आदेश निर्गमित करावे व त्याबाबत या संचालनालयास कळवावे.

**सदर कर्मचाऱ्यांच्या संवर्ग बाह्य बदल्या खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून करण्यात येत आहेत:-**

१) पूर्वीच्या विभागातील लेखापरीक्षा लिपिक संवर्गातील सेवा, बदली झालेल्या विभागात त्या संवर्गातील ज्येष्ठतेसाठी गणली जाणार नाही. त्यामुळे बदली झालेल्या विभागात रूजू झाल्याच्या तारखेपासून त्या विभागाच्या लेखापरीक्षा लिपिक संवर्गाच्या ज्येष्ठता यादीत सर्वात कनिष्ठ म्हणून त्यांना ठरविले जाईल. म्हणजेच पूर्वीच्या सेवा ज्येष्ठता यादीवरील नाव काढून टाकण्यात येईल व पूर्वीच्या पदावर धारणाधिकार राहणार नाही.

२) कोणत्याही कारणास्तव कर्मचारी ज्या विभागातून बदलून आला आहे. त्या विभागात किंवा इतर विभागात बदली मिळणार नाही आणि तसेच पूर्वीच्या विभागातील ज्येष्ठतेशी तथा मुळ पदाशी संबंध राहणार नाही.

३) बदली झाल्यानंतर कर्मचारी विभागात रूजू झाल्याच्या तारखेपासुन, त्या विभागाच्या लेखापरीक्षा लिपिक संवर्गात कनिष्ठतम गणला जाणार असल्यामुळे सर्वसाधारण कपातीच्या वेळी अगर त्या संवर्गातील पदे कमी झाल्यामुळे अगर कोणत्याही करणास्तव त्या विभागात सदर कर्मचारी अतिरिक्त ठरला तर कोणतेही कारण न दर्शविता अगर पूर्व सुचना न देता सदर कर्मचाऱ्याची सेवा समाप्त करण्यात येईल.

४) पूर्वीच्या सेवेचा लाभ, वेतननिश्चिती, रजा, निवृत्तीवेतन याकरीता वित्त विभागाच्या संबंधित नियमातील तरतुदींनुसार अनुज्ञेय होईल.

५) या बदलीच्या अनुषंगाने पदग्रहण अवधी, बदली अनुदान, प्रवासभत्ता वा तद्नुषंगिक लाभ अनुज्ञेय होणार नाहीत.

वरील कर्मचाऱ्यांना बदलीच्या पदावर हजर होण्यासाठी त्यांच्या जागी तातपुरती स्थानिक व्यवस्था करून त्वरीत कार्यमुक्त करावे. त्यांना या संचालनालयाच्या पूर्व परवानगीशिवाय रजा मंजुर करण्यात येऊ नये, किंवा त्यांचा मुदतवाढीचा प्रस्तावही सादर करण्यात येऊ नये. त्यांना कार्यमुक्त केल्याचा आणि त्यांनी बदलीच्या ठिकाणी पदग्रहण केल्याचा अहवाल संबंधित कार्यालय प्रमुखांनी या संचालनालयास तात्काळ पाठवावा.

(प्रताप मोहिते)
संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
महाराष्ट्र राज्य.

प्रत:-

१.सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोकण ,पुणे, नाशिक, औरंगाबाद व नागपुर विभाग.
२.उपसंचालक(म.न.पा.ले.प), उपविभाग-३ औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.
३.सहाय्यक संचालक (प्रशासन), संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई.
४.संबंधित कर्मचारी
५.संबंधित कर्मचाऱ्याची वैयक्तिक नस्ती
६. निवड नस्ती.

Harshada /disk ३/ आस्था-५/बदली/ २०१८/vibhagbahy/ badali adesh